आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

६ एप्रिल २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी बड्या नेत्यांच्या जाहीर सभा/ काँग्रेसची आणखी एक उमेदवार यादी जाहीर
- महाराष्ट्रात दुसऱ्या टप्प्यातल्या आठ मतदारसंघात छाननीनंतर एकूण ३५२ पैकी २९९ अर्ज वैध
- भाजपाच्या ४४व्या स्थापनादिनानिमित्त प्रधानमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांच्या शुभेच्छा
- दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत १८ एप्रिलपर्यंत वाढ

  **आणि**

- कझाखस्तान आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीच्या विजेतेपदावर अनुपमा उपाध्यायची मोहोर

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराला दिवसेंदिवस रंग चढत असून मोठ्या राजकीय पक्षांच्या स्टार प्रचारकांच्या जाहीर सभा ठिकठिकाणी होत आहेत.

लोकसभा निवडणूक प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी उत्तरप्रदेशातील सहारनपुर इथं जाहीर सभा घेतली. दुपारी राजस्थान मधील अजमेर तालुक्यात पुष्कर इथं ते सभा घेतील. राजस्थान मधील त्यांची ही तिसरी जाहीर सभा आहे. त्यानंतर संध्याकाळी ते उत्तरप्रदेशात गाझियाबाद इथं रोड शो मध्ये सहभागी होणार आहेत. काँग्रेस पक्षाच्या वतीने आज राजस्थानात जयपूर इथं पक्षाच्या जाहीरनाम्याच्या अनुषंगानं मोठी प्रचार सभा होणार असून, त्यामध्ये

पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी सहभागी होणार आहेत.

<><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज सहा जागांसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली. पक्षानं उत्तर गोवा मतदारसंघात रमाकांत खलप यांना तर दक्षिण गोव्यात कॅप्टन विरिऍटो फर्नांडिस यांना उमेदवारी दिली आहे. याशिवाय मध्य प्रदेशात मोरेना इथून सत्यपाल सिंग सिकरवार आणि ग्वाल्हेर मधून प्रवीण पाठक काँग्रेसच्या वतीनं निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

<><><><>

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रात आठ मतदारसंघात मतदान होणार असून कालच्या छाननीत एकूण ३५२ उमेदवारांपैकी २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यात नांदेडमधे सर्वाधिक ६६ अर्ज वैध ठरले आहेत. या टप्प्यात उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख ८ एप्रल असून २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

<><><><>

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीची तयारी जोरात सुरु असून मतदानाचं प्रमाण विशेषतः महिला मतदारांचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. यादृष्टीनं प्रत्येक मतदारसंघात संपूर्णपणे महिलांचं व्यवस्थापन असलेली मतदानकेंद्र उभारण्यात येत आहेत. राज्यात अशा प्रकारची ४४० मतदानकेंद्र असतील. त्यापैकी ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक ३६ त्यापाठोपाठ जळगाव मध्ये ३३, नाशिक आणि रत्नागिरी मध्ये प्रत्येकी ३० तर मुंबई उपनगरात २६ मतदानकेंद्र

असतील. या केंद्रांवर सर्व महिला कर्मचारी आणि महिला पोलीस असतील. सुरक्षेच्या दृष्टीने ही केंद्र तालुका कार्यालय आणि पोलीस ठाण्यांच्या जवळच उभारण्यात येणार आहेत.

<><><><><>

भाजपा आज ४४ वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. गेली अनेक वर्ष कठोर परिश्रम, संघर्ष आणि त्यागातून पक्षाची उभारणी केलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अविभाज्य घटक असल्याबद्दल भाजपाला अभिमान वाटत असून ही भागीदारी आणखी दृढ व्हावी, असं ही त्यांनी म्हटलं आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाह आणि अध्यक्ष जे पी नड्डा यांनीही सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

शिवसेना शिंदे गटाचे कल्याणचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील, त्यांच्या पाठीशी महायुतीतील सर्व घटक पक्ष भाजपा सहित यांना मताधिक्याने निवडून आणतील असं भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमात संबोधित केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.

भारतीय जनता पक्ष हा देशातातील सर्वात मोठा सदस्य असलेला त्याचप्रमाणे सर्वात जास्त स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आमदार असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही कारण या पक्षाचे कार्यकर्ते हे आत्मकेंद्रीत नाही असं त्यांनी

पक्षस्थापना दिनाप्रसंगी संबोधित करताना सांगितलं. या प्रसंगी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर भाजपामधील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

<><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण अकोला लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><>

आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत १८ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यांना आज दिल्लीतल्या राऊज ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं. दिल्ली उत्पादनशुल्क धोरण घोटाळ्याप्रकरणी विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह देखील न्यायालयात हजर होते. त्यांची नुकतीच जामिनावर सुटका झाली आहे.

<><><><>

अमेरिकेत न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया आणि वॉशिंगटन डीसीला काल भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाची तीव्रता ४ पूर्णांक ८ दशांश रिक्टर होती. त्यानंतर लागोपाठ ६

वेळा भूकंपाचे धक्के जाणवले असल्याचं अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागानं सांगितलं आहे. यात कोणतीही जीवीत आणि वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही. न्यूजर्सी प्रदेशात भूकंप होणं ही दुर्मीळ घटना असून गेल्या ५० वर्षातला हा तिसरा शक्तिशाली भूकंप असल्याचं भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अस्ताना इथं सुरु असलेल्या कझाखस्तान आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत  महिला एकेरीच्या अंतिम फेरीत भारतीय खेळाडू अनुपमा उपाध्यायनं भारताच्याच ईशाराणी बरुआ हिचा पराभव करून विजेतेपद पटकावलं आहे. अनुपमानं ४१ मिनिटात २१-१५, २१-१६ अशा फरकानं ईशाराणीला मात दिली. पुरुष एकेरीत तरुण मन्नेपल्ली यानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. तर मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या संजय धनराज आणि मनीषा के या जोडीला मात्र मलेशियाच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ५ हॉकी सामन्यांची मालिका आज सुरू होत आहे. या मालिकेतला पहिला सामना आज ऑस्ट्रेलियात पर्थ हॉकी स्टेडियमवर भारतीय प्रमाणवे◌ेळेनुसार दुपारी २ वाजता सुरू होईल. हरमनप्रीत सिंग भारतीय संघाचा कर्णधार आहे. तर ऑस्ट्रेलिया संघाचं नेतृत्व अरान झालेव्स्की करत आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २०१३ पासून ४३ सामने झाले असून ऑस्ट्रेलियानं २८ सामने आणि भारतानं ८ सामने जिंकले आहेत. पॅरिस २०२४ ऑलिम्पिकसाठी भारत आणि ऑस्ट्रेलिया एकाच गटात असल्यामुळे ही मालिका महत्त्वाची आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर बंगळुरूशी होणार आहे. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

दरम्यान काल रात्री झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने चेन्नई सुपर किंग्जचा ६ गडी राखून पराभव केला.

<><><><><>

तेलंगणाच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन माओवादी ठार झाले. एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, तेलंगणात मुलुगी जिल्ह्यातल्या आंतरराज्य सीमेजवळच्या पुजारी कांकेर जंगलात ही चकमक झाली. तेलंगणाच्या नक्षलविरोधी दलाच्या ग्रेहाऊंडच्या पथकानं जंगल परिसरात नक्षलवाद्यांना घेरले. ग्रेहाऊंड पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून एक एके ४७, एक एलएमजी आणि एक १२-बोअर बंदूक. जप्त केली आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात उरी सेक्टरमध्ये सबूर नाला या सीमावर्ती भागात काल दहशतवाद्यांनी केलेला घुसखोरीचा प्रयत्न सुरक्षा दलाच्या जवानांनी हाणून पडला. यावेळी झालेल्या चकमकीत २ दहशतवादी ठार झाले. त्यानंतर सुरक्षा दलाच्या जवानांनी या भागात मोठी शोध मोहीम राबवली. यावेळी दोन ए के सिरीज रायफल्स, ४ ग्रेनेड आणि काही प्रमाणात स्फोटके जप्त केली. देशातील आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भारत- पाक सीमेपलीकडून मोठ्या

प्रमाणावर घुसखोरी होण्याची शक्यता असून, त्यासाठी सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

<><><><><>

देशाच्या पूर्व भागातली राज्ये आणि किनारपट्टीच्या भागात, आज आणि उद्या असे दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे. गोवा आणि कर्नाटकच्या किनारपट्टीच्या भागात उद्यापर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील.

//<><><><><>//